REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 9 | JUNE - 2022

# मंदावलेली वाचन प्रक्रिया सुरळीत करताना

पूनम पाटील
सहशिक्षिका, निर्मलताई ठोकळ प्रशाला, सोलापूर.

**प्रस्तावना :**



मंदावलेली वाचन प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. अवांतर वाचनाची सवय लागावी यासाठी कोरोना कालावधी नंतर, मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा या उद्देशाने हा उपक्रम निवडण्यात आला आहे. भविष्यात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची मदत घेऊन अध्ययनाची प्रक्रिया पूर्ण करायची आहे. — मात्र तंत्रज्ञानाचा योग्य वापर व्हावा, अतिवापराचे दुष्परिणाम यापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी भविष्यात येणारी आव्हाने यांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी त्यांना वाचनाकडे वळवणे गरजेचे आहे. त्यांना अवांतर वाचनाची सवय लागण्यासाठी नवनविन पध्दतीच्या माध्यमातून विदयार्थ्याना वाचनाकडे घेऊ जाणे व वाचन प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे. या संशोधनाने सिद्ध आले आहे कि वाचनाने आपली प्रतिभा वाढविता येते. त्यासाठी अनेक तंत्र विकसित झाली आहेत. माझ्या विकासात वाचन ही महत्त्वाची क्रिया आहे

*** संशोधन समस्येची गरज :**

कोरोना कालावधी नंतर ऑफलाईन पद्धतीने शाळा चालू झाले, मात्र विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गती मंदावलेली दिसून आली. संशोधकाला ही बाब 8 वी च्या विदयार्थ्यांमध्ये वाचनाची आवड राहीली नाही, विदयार्थ्यांमध्ये मोठ्यांनी वाचण्याचा आत्मविश्वास राहीला नाही याची खात्री केल्यानंतर संशोधन कार्य सुरु झाले.

**संशोधनाचे महत्त्व :**

हे संशोधन पुढील घटकांसाठी महत्त्वाचे आहे.

1. सदर संशोधन हे विद्यार्थी शिक्षक यांना त्यांच्या ज्ञानात वाढ करण्यासाठी उपयुक्त आहे.
2. विदयार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी शिक्षकांना उपयुक्त आहे.
3. सदर 'संशोधन सर्व स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठी राबवू शकतो.
4. शाळा बाहय घटकांसाठीही हे संशोधन उपयुक्त आहे.

*** शीर्षक :**

**इयत्ता 8 वी च्या विद्यार्थ्यांसाठी वाचन अभिरुची विकसन कार्यक्रमाची निर्मिती एक अभ्यास"**

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. मंदावलेली वाचन प्रक्रिया सुधारण्यासाठी विविध उपक्रमाद्वारे वाचनाची गोडी निर्माण करणे .
2. अवांतर वाचनाची सवय, वाचनातून ज्ञानात भर , वाचन समृध्दी घडवून आणणे.
3. प्रेरणादायी वाचनातून आत्मविश्वास निर्माण करणे.

**परिकल्पना:** वाचनासाठी छोट्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन प्रेरणा निर्माण होते.

**संशोधनाची व्याप्ती :**

1. प्रस्तूत संशोधन इयत्ता 8 वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे मराठी वाचनासाठी आहे.

**संशोधन पद्धतीची निवड:**

सदर संशोधन समस्येची उद्दिष्टये, स्वरूप, व व्याप्ती लक्षात घेऊन संशोधकाने प्रयोगिक, संशोधन पध्दतीची निवड केली आहे. या अभ्यास क्षेत्रातून संशोधकाने 54 विद्यार्थी स्वनिर्णित नमुना निवड पद्धतीने निवडलेले होते. प्रत्येक गटात 27 विद्यार्थी होते.

**चाचणीची प्रत्यक्ष अंमलबजावणी :**

संशोधकाने संशोधन समस्येची अधिक व अचूक माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली चाचणी नियोजनानुसार नियंत्रित व प्रायोगिक गटाला देऊन ती सोडवून घेतली. सदर चाचणी घेताना पाठाचे वातावरण , वेळेचे नियोजन बाबीवर भर देण्यात आला

**विश्लेषण व निष्कर्ष:**

| गट | मध्यमान | प्रमाण विचलन | t- मूल्य | t-मूल्य कोष्टकानुसार |
|---|---|---|---|---|
| नियंत्रित गट | 15.23 | 3.210 | 2.214 | 2.021 |
| प्रायोगिक गट | 16.57 | 3.571 | | |

त्या दोन्ही गटाच्या चाचणीत प्राप्त केलेल्या प्राप्तांकाचे विश्लेषण करून संख्याशास्त्राच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले.

वरील कोष्टकांवरून असे दिसून येते की, मिळालेल्या 't' मूल्यावरून शून्य परिकल्पनेचा त्याग करायचा की स्वीकार करायचा त्या मूल्यांची ०.०५ किंवा ०.०१ या सार्थकता स्तरावर विशिष्ट स्वाधीनता मात्रेकरिता पत्रकात दिलेल्या 't' मूल्यांशी तुलना करून ठरविल जाते. यावरुन आपणाला असे अन्वयार्थ लावता येईल की, स्वाधीनता मात्रा 56 आहे. परिकल्पना द्विपुच्छ आहे. 0.05 सार्थकता स्तराची किंमत 2.021 आहे. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे मूल्य 2.214 आहे. हे गुणोत्तर 0.05 सार्थकता स्तरापेक्षा जास्त आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे लक्षात येते की, वाचनासाठी राबविलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या वाचनकौशल्यात वाढ होते.